MCAER
कृषि परिषद

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद,

१३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे - ४११ ००७.

ई मेल- mcaer@rediffmail.com दूरध्वनी क्र.- ०२०-२५५२८६८८

संकेतस्थळ- www.mcaer.org

जा.क्र. मकृप/शिक्षण-१/२२२५/२८१/१६०९ दि. १० जून,२०२५

## परिपत्रक

**विषयः- पदवी प्रवेश प्रक्रिया २०२५-२६ अंतर्गत कृषी व संलग्न विद्याशाखेच्या पदवी महाविद्यालयांनी राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाच्या पोर्टलवर नोंदणी करण्याबाबत.**

राज्यातील चारही कृषी विद्यापीठांतर्गत सर्व पदवी महाविद्यालयातील पहिल्या वर्षाची प्रवेश प्रक्रिया राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाच्या नियंत्रणाखाली राबविण्यात येते. मा.आयुक्त तथा सक्षम प्राधिकारी, राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष यांच्या दि.११/०६/२०२५ रोजीच्या पत्रानुसार सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षातील प्रवेश प्रक्रियेमध्ये सहभागी होण्याकरिता सर्व शासकीय / अनुदानित / कायमस्वरूपी विना अनुदानित महाविद्यालयांनी दि.२०/०६/२०२५ पर्यंत राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाच्या खालील लिंकद्वारे संकेतस्थळावर नोंदणी प्रक्रिया करावयाची आहे.

**https://regugcollege.agriadmissions.in/AgriUGCollegeReg/InstituteLoginRegistration.aspx**

यास्तव राज्यातील चारही कृषी विद्यापीठांतर्गत सर्व पदवी अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयांना या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, त्यांनी राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाच्या उक्त संकेतस्थळावर विहित मुदतीत महाविद्यालयाची नोंदणी करावी. महाविद्यालयाच्या नोंदणीकरिता शासकीय / अनुदानित / कायमस्वरूपी विना अनुदानित महाविद्यालयांनी शासन निर्णय / मान्यतेचे पत्र तसेच कायमस्वरूपी विना अनुदानित महाविद्यालयांनी संबंधित कृषी विद्यापीठाचे ना हरकत प्रमाणपत्र, शुल्क नियामक प्राधिकरणाचे चालू शैक्षणिक वर्षाकरिता ग्राह्य असलेले शुल्क निश्चितीचे पत्र संकेतस्थळावर अपलोड करावे. याचबरोबर नोडल अधिकारी,

त्यांचे संपर्क क्रमांक, ई-मेल पत्ता, भ्रमणध्वनी क्रमांक, मुले/मुलींसाठी वसतीगृहाची क्षमता इत्यादी माहिती देण्यात यावी.

महाविद्यालयांनी उक्त संकेतस्थळावर नोंदणी न केल्यास अशा महाविद्यालयांचा प्रवेश प्रक्रियेमध्ये समावेश करता येणार नाही व याबाबतची सर्व जबाबदारी संबंधित महाविद्यालयाची राहील, याची कृपया नोंद घ्यावी.

**(यशवंत साळे)**
**संचालक (शिक्षण)**

प्रति,

**सहयोगी अधिष्ठाता / प्राचार्य,**
चारही कृषी विद्यापीठांतर्गत सर्व पदवी महाविद्यालये.

प्रतः- **कुलसचिव,** महात्मा फुले कृषी विद्यापीठ,राहुरी, जि.अहमदनगर / डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला / वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी / डॉ.बाळासाहेब सावंत कोंकण कृषी विद्यापीठ, दापोली जि.रत्नागिरी

यांना सूचित करण्यात येते की, महाविद्यालयांनी नोंदणी करण्याचा अंतिम दि.२०/०६/२०२५ ही मुदत राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाने निश्चित केलेली आहे. त्यामुळे प्रवेश प्रक्रियेसाठी पात्र असलेल्या आपल्या कार्यक्षेत्रातील कायमस्वरूपी विना अनुदानित महाविद्यालयांना 'ना हरकत प्रमाणपत्र' देण्याची कार्यवाही सत्वर करावी. तथापि, कायमस्वरूपी विना अनुदानित महाविद्यालयांना 'ना हरकत प्रमाणपत्र' देतेवेळी संबंधित महाविद्यालय आवश्यक त्या सर्व निकषांची पूर्तता करत असल्याची खातरजमा करण्यात यावी. याचबरोबर पात्र महाविद्यालये 'ना हरकत प्रमाणपत्रा'पासून वंचित राहणार नाही, याचीही दक्षता घेणे आवश्यक आहे. अन्यथा याची जबाबदारी सर्व संबंधितांवर राहील. सदर परिपत्रकाबाबत आपल्या कार्यक्षेत्रातील सर्व पदवी महाविद्यालयांना अवगत करण्याचेही सूचित करण्यात येते.

प्रतः- **मे. विबास टेक्नोलॉजी , पुणे** यांना सूचित करण्यात येते की, सर्व संबंधितांना अवगत होण्याच्या दृष्टिकोनातून त्यांनी सदरचे परिपत्रक कृषी परिषदेच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून द्यावे.

प्रतः- १. **मा. आयुक्त तथा सक्षम प्राधिकारी,** राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, ८ वा मजला, न्यु एक्सलसियर बिल्डींग, ए. के. नायक मार्ग, फोर्ट, मुंबई ४००००१ यांना माहितीसाठी सविनय सादर...

२. मा.महासंचालक यांचे स्वीय सहायक, महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांना माहितीस्तव.